**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/२०९/२०२३

दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. महेश रामा जाधव
रा. कुंभारी ता.जत जि.सांगली
सध्या रा.कुंजरवाडा महाराणा चौक,
कार्केट रोड, नंदुरबार ता.नंदूरबार जि.नंदूरबार.... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. लता रामा जाधव
२. योगेश रामा जाधव
दोघे रा. वैशालीनगर, प्लॉट नंबर-२५,
कन्यादान हॉल शेजारी, नंदूरबार, ता.जि.नंदूरबार ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे.कुंभारी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ५२८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर २२७० प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे.कुंभारी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ५२८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर २२७० प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

२. अपिलार्थी यांचे म्हणण्यान्वये जाबदार ०१ ही मयत कै.रामा नारायण जाधव यांची दुसरी पत्नी असून हिंदू वारसा कायदयाप्रमाणे दुस-या पत्नीला कायदयाने कोणताही अधिकार नाही. त्यामुळे वादातीत वारस फेरफार रद्द करणेची विनंती करीत आहेत. वास्तविक मयत कै.रामा नारायण जाधव यांना दोन पत्नी आहेत तर पहिली पत्नी कोणती व दुसरी पत्नी कोणती याबाबत कोणताही कायदेशीर पुरावा अथवा सक्षम न्यायालयाचा आदेश पुरावा म्हणून सादर केलेला नाही. तसेच अपिलार्थी यांनी वंशावळ सादर केलेली असून सदर वंशावळ भारतीय पुरावा कायदयातील तरतूदीनुसार कागदोपत्री पुराव्यासह सिध्द केलेली नाही. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील अर्ज पहाता दिवाणी स्वरूपाचे मुद्दे उपस्थीत करून २० वर्ष ०२ महिणे इतक्या विलंबाने तथ्यहीन अपील दाखल करून न्याय मागणेचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांचे दाखल अपील अर्जातील उपरोक्त वस्तुस्थीती व कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांनी वारसांबाबत सक्षम दिवाणी न्यायालयामध्ये दाद मागणे उचीत होणार आहे.

३. विलंबाबाबत म्हणावे तर २० वर्ष ०२ महिन्याचे विलंब माफ करावे असे कोणतेही कारण विलंब माफ अर्जात नाही. मुळात अपिलार्थी यांची अपिल अर्जातील मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना केलेला विंलब अर्ज कायदयाचे कसोटीवर टिकू शकत नाही. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफ अर्जाचे मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.